भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA DA 032444

क्रमांक 2663 दिनांक 1690
रुपये १०५
नांव सुवर्णा
पत्ता
हस्ते
श्री. सोलंकर प्रमोद पी.,
मुद्रांक विक्रेता, गवळीनगर, भोसरी, पुणे ३९
ला.नं.हवेली ५/३८/१९९५

NOTARY BALASAHEB T. THOPATE PUNE DIST. MAHARASHTRA R.NO.3269 GOVT. OF INDIA

3 JUN 2010

**-: संमतीपत्र :-**

करारपत्र आज वार = बुधवार, दिनांक = ०९/०६/२०१० इसवी ते दिवशी....

**सावित्रीबाई शिक्षण मंडळ** )
**तर्फे अध्यक्ष श्री. जनार्दन बाबुराव रोडे**
**वय = ८५, धंदा = निवृत्त** ) .... संमतीपत्र लिहून घेणार
**रा. सर्व्हे नं. ८४/२ अ, साई पार्क, दिघी, पुणे १५** )
(ज्यामध्ये लिहून घेणार यांचे वालीवारस, अॅडमिनीस्टेटर्स, एक्झीक्यूटर्स व असाईनीज यांचा समावेश )

यांसी . .

**श्री. अरूण जनार्दन रोडे** )
**वय : ४६, वर्षे, धंदा =नोकरी** ) .... संमतीपत्र लिहून देणार
**रा. सर्व्हे नं. ८४/२ अ, साई पार्क, दिघी, पुणे १५** )
(ज्यामध्ये लिहून देणार यांचे वालीवारस, अॅडमिनीस्टेटर्स, एक्झीक्यूटर्स व असाईनीज यांचा समावेश )

कारणे करारपत्र लिहून देतो की,

१.**मिळकतीचे वर्णन** : तुकडी–पुणे, पोट तुकडी, तालुका हवेली, मा. दुय्यम निबंधक सो. हवेली तसेच पिंपरी चिंचवड महानगपालिका यांचे हद्दीतील गांव मौजे **दिघी** येथील **सर्व्हे नं. ८४/२ अ, साई पार्क, दिघी, पुणे १५ मधील क्षेत्र २५०० चौ. फुट** मधील आर. सी. सी. बांधकामातील इमारत मिळकत.

सदर वर कलम १ यात वर्णन केलेली मिळकत ही लिहून देणार यांचे मालकी हक्क वहीवाटीची असून सदर मिळकतीमध्ये लिहून घेणार हे सावित्रीबाई शिक्षण मंडळ या संस्थेची शाळा चालवित आहे. तसेच त्यांना शाळेचे कामकाजासाठी इमारत आवश्यक असल्याने त्यांनी विनंती केले वरून लिहून देणार हे लिहून घेणार यांना शाळेचे कामकाजासाठी ठरेल त्या भाडेतत्वावर वापरण्यास देत आहे. म्हणून लिहून देणार हे संमती पत्र देत आहेत.

येणेप्रमाणे संमतीपत्र लिहून देणार यांनी लिहून घेणार यांना राजीखुशीने व स्वखुषीने लिहून दिले असून ते आमचेवर पुर्णपणे बंधनकारक आहे.

**पुणे.**
**दि. ०९/०६/२०१०.**

**साक्षीदार–**

१) सही = Abnave
नाव = ज्ञानदेव सोनबा आबनावे
पत्ता = साई पार्क सर्वे नं. ८४/२अ दिघी पुणे १५

२) सही = [signature]
नाव = पंडीत राजकुमार नामदेवराव
पत्ता = साई पार्क, दिघी, पुणे १५

[signature]
**सावित्रीबाई शिक्षण मंडळ**
**तर्फे अध्यक्ष श्री. जनार्दन बाबुराव रोडे**
**लिहून घेणार**

[signature]
**श्री. अरूण जनार्दन रोडे**
**लिहून देणार**

NOTARY BALASAHEB T. THOPATE PUNE DIST. MAHARASHTRA R.NO.3269 GOVT. OF INDIA

BEFORE ME
BALASAHEB T. THOPATE
NOTARY, GOVT OF INDIA
BHOSARI PUNE-39

9 JUN 2010

भारतीय गैर न्यायिक

भारत INDIA

रु. 500 FIVE HUNDRED RUPEES

पाँच सौ रुपये Rs. 500

सत्यमेव जयते

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◐ 2018 ◐ AM 356376

अनु.क्र. ........ दि. ........ मु.शु.रक्कम ........

दस्ताचा प्रकार ........

दस्त नोंदणी करणार आहेत का ? होय/नाही.

मिळकतीचे वर्णन ........

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नांव ........

पत्ता ........

दुसऱ्या पक्षकाराचे नांव ........

हस्ते व्यक्तीचे नाव व पत्ता ........

वैशाली राम हिंगमिरे
परवाना क्र. २२०९०५६
मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही पुणे-नाशिक रोड, भोसरी, पुणे-३९

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्यापासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे.

वरिष्ठ कोषागार अधिकारी पुणे
27 DEC 2018
सहाय्यक मुद्रांक लिपीक कोषागार पुणे करिता

NOTARY
BALASAHEB D. MATE
Charholi Bk., Tal. Haveli, Dist. - Pune
MAHARASHTRA
REG. NO.7598
GOVT. OF INDIA

## लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा

लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारनामा आज दिनांक १ माहे जानेवारी सन २०१९ इसवी ते दिवशी......

NOTARY
GOVERNMENT OF INDIA
BALASAHEB D. MATE
Charholi Bk. Tal. Haveli
Dist.-Pune
MAHARASHTRA
REG. NO.7395

**श्री. संजय शिवाजी गायकवाड**
वय —४८वर्षे, धंदा— व्यवसाय
रा. शिवदत्त निवास पुणे आळंदीरोड
दिघी ता. हवेली जि. पुणे. } **लिहुन घेणार**

यांसी....

**सावित्रीबाई शिक्षण मंडळाचे इंद्रायणी इंग्लिश**
**मिडीअम स्कुल तर्फे अध्यक्ष**
**सौ. सुवर्णा अरूण रोडे**
वय —४८वर्षे, धंदा— व्यवसाय
रा. स.नं. ८४/२/अ गणेशविहार साईपार्क
दिघी ता. हवेली जि. पुणे. } **लिहुन देणार**

**करारनामा लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनाम्याची मुदत ६० महिने**

**कारणे लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा लिहून देतो तो खालीलप्रमाणे :—**

NOTARY
BALASAHEB ... ATE
Haveli
INDIA

**१) मिळकतीचे वर्णन:—** तुकडी पुणे, पोट तुकडी, ता. हवेली मे. दुय्यम निबंधक साहेब हवेली यांच्या हद्दीतील तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या हद्दीतील गांव मौजे **दिघी येथील** स.नं. ८१/१/१ कृष्णानगर यांसी क्षेत्र १ एकर मधील मोकळी जागा सावित्रीबाई शिक्षण मंडळाचे इंद्रायणी इंग्लिश मिडीअम स्कुल या शाळेच्या मैदानासाठी मुलांना खेळावयास वापरणेसाठी सदरील करारनामा असे.

२) वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत ही तुमच्या मालकीची व वहिवाटीची असून तशी सरकारी दप्तरी नोंद आहे. सदरची मिळकत ही ६० महिन्याकरीता तुम्ही लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारावर देण्याचे ठरविले, त्यावरून तुमचे व आमचे दरम्यान या संबंधात आपसात वाटाघाटी होऊन सदरची मिळकत ही तुम्ही आम्हांस ६० महिन्याकरीता लिव्ह ॲण्ड लायसेन्स करारान्वये देण्याचे ठरवले. त्याच्या अटी व शर्ती पुढीलप्रमाणे :—

३) वर कलम १ यांत वर्णन केलेली मिळकत ही लिहुन घेणार यांचे खरेदी मालकी वहिवाटीची असून आज रोजी प्रत्यक्ष ताबे वहिवाटीस आहे. लिहुन देणार यांना जागेची गरज भासल्याने सदर मिळकत तुम्ही लिहुन लिव्ह ॲन्ड लायसेन्स बेसिसवर घेण्याची मागणी केली व ती लिहुन घेणार यांनी मान्य केली व आज रोजी त्याचा प्रत्यक्ष ताबा लिहून देणार यांना दिला आहे. **सदर मोकळी जागा ही सावित्रीबाई शिक्षण मंडळाचे इंद्रायणी इंग्लिश मेडीअम स्कुल या शाळेच्या मैदानासाठी मुलांना खेळावयास तुम्ही लिव्ह लायसेंन्सी घेतली आहे.** सदर मिळकत ६० महिन्याकरीता लिव्ह ॲण्ड लायसेन्स कराराने देण्याचे ठरविलेले असून त्याची मुदत **दिनांक १/१/२०१९** पासून **दिनांक ३१/१२/२०२३** पर्यंत राहील ही या कराराची सर्वात महत्वाची अट व शर्त आहे. सदर कराराची मुदत ही ६० महिन्याची असुन **दिनांक ३१/१२/२०२३** रोजी संपत असुन त्याच दिवशी सदर मिळकतीचा खुला प्रत्यक्ष ताबा विनातक्रार विनाविलंब आम्ही तुम्हांस द्यावयास बांधील आहे.

४) सदरची मिळकत ही कराराचे कालावधीत सुस्थितीत ठेवावयाचे आहे. कोणत्याही प्रकारचे नुकसान करावयाचे नाही. जर काही नुकसान केले तर त्याची भरपाई ही लिहुन देणाराने द्यावयाचे आहे. कराराने लिहुन देणार यांना भाडेकरी अथवा अन्य कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत याची जाणीव व कल्पना लिहुन देणार यांना आहे.

५) सदर मिळकतीमध्ये लिहुन घेणार यांना मिळकतीमध्ये जाण्याचा व पाहणी करण्याचा कराराच्या कालावधीमध्ये लिहुन घेणार यांना लिहुन देणार यांच्या उपस्थितीत पाहणी करण्याचा हक्क व अधिकार राहील.

६) सदरचा करारनामा हा ६० महिन्याकरीता असून त्यापुढील कालावधीत सदर मिळकत लिहुन देणार यांनी लिहुन घेणार यांना परत करावयाचे आहे. सदर मिळकत लिहुन घेणार हे त्यांच्या मर्जीनुरूप वापर करतील त्याबद्दल लिहुन देणार यांची काहीही तक्रार नाही. सदर करारनाम्याची मुदत ६० महिने मुदत संपलेनंतर सदरची मिळकत कराराची मुदत वाढविण्याची असल्यास लिहुन घेणार व लिहुन देणार यांच्या संमतीने वाढविण्यात येईल.

७) सदर लिहुन देणार यांनी शेजारील लोकांना त्रास व उपद्रव होईल असे वर्तन करावयाचे नाही. केल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी लिहुन देणार यांचेवर आहे व राहील. सदर मिळकतीमध्ये कायमस्वरूपी कोणत्याही प्रकारचा फेरबदल बांधकाम वगैरे लिहुन देणार यांना करता येणार नाही. अन्यथा असा काही प्रकार केल्यास ते लिहुन देणार यांनी काढून नेण्याचे आहे. सदर मिळकत लिहून देणार यांचे ताब्यात असताना त्यांनी सदर मिळकतीत कोणत्याही बेकायदेशीर वस्तू अथवा द्रव, त्याचप्रमाणे स्फोटके की ज्यामुळे सदर मिळकत व आजुबाजूचे रहिवासी यांचे जीव धोक्यात येतील असे ठेवू नयेत.

८) सदर कराराची मुदत ही **दिनांक ३१/१२/२०२३** रोजी संपत असून त्याच दिवशी सदर मिळकतीचा खुला व प्रत्यक्ष ताबा लिहुन घेणार यांना देण्याचे लिहुन देणार यांचेवर बंधनकारक आहे.

९) लिहुन देणार यांनी सदर मिळकतीचा वापर फक्त सावित्रीबाई शिक्षण मंडळाचे इंद्रायणी इंग्लिश मेडीअम स्कुल **या शाळेच्या मैदानासाठी या मोकळया जागेसाठी मुलांना खेळण्यासाठी वापर** करावयाचा आहे. सदर मोकळया जागेसाठी आवश्यक असणाऱ्या सर्व प्रकारच्या परवानग्या देण्यास लिहुन घेणार यांची पूर्ण संमती आहे. तसेच सदर मिळकतीचा वापर अन्य कोणत्याही कारणासाठी करता येणार नाही. सदर कालावधीमध्ये मिळकतीचे नुकसान झाल्यास लिहुन देणार हे स्वखर्चाने करून देतील.

१०) ह्या करारान्वये आम्ही मान्य व कबुल केलेल्या अटी व शर्तींपैकी कोणत्याही अटीचा अगर शर्तीचा भंग केल्यास सदरील करारनामा त्याच क्षणी आपोआप संपुष्टात येणेचा आहे. त्याबाबत आम्ही तुमचेकडे तक्रार करणार नाही.

११) सदर मिळकतीचा वापर लिहुन देणार यांनी लायसेन्सी म्हणूनच करावयाचा आहे. सदर मिळकतीमध्ये त्यांना भाडेकरू म्हणून अगर इतर कसलाही हक्क, हितसंबंध प्राप्त होण्याचा नाही.

१२) सदर करारनामा तुम्हांस मुदतीचे अगोदर संपुष्टात आणावयाचा असल्यास तुम्ही आम्हांस **एक महिन्याचे आगावू लेखी नोटीस** देण्याची आहे. याउलट हा करारनामा आम्हांस मुदतीचे पूर्वी संपुष्टात आणावयाचा असल्यास आम्ही तुम्हांस एक महिन्याची आगावू लेखी नोटीस देण्याची आहे.

येणेप्रमाणे सदरचा लिव्ह अॅण्ड लायसेन्स करारानामा आज रोजी आम्ही राजीखुशीने व अक्कलहुशारीने समजून उमजून लिहुन ठेवला असे.

राक्षीदार --

१. सही · Vnaik

नाव : सौ. वंदना चंद्रशेखर नाईक

पत्ता : शिवगणेश कॉलनी नं. १
साई पार्क दिघी पुणे-१५



सावित्रीबाई शिक्षण मंडळाचे इंद्रायणी इंग्लिश
मिडीअम स्कुल तर्फे अध्यक्ष
सौ. सुवर्णा अरूण रोडे

लिहून देणार

२. सही Varsha

नाव : सौ वर्षा हरिशचंद्र कंठके

पत्ता : साई पार्क दिघी पुणे-१५



श्री. संजय शिवाजी गायकवाड

लिहून घेणार

NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL NOTARIAL

BEFORE ME

BALASAHEB D. MATE
ADVOCATE & NOTARY
GOVT. OF INDIA
Charholi Bk. Tal. Haveli, Dist. - Pune

NOTED AND REGISTERED
AT SERIAL NO 496/019
ON 1/1/019